समस्त मराठा बांधवांना त्यांच्या हक्काच्या मिळालेल्या आरक्षणाबद्दल सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन परिवारातर्फे कोटी कोटी शुभेच्छा..!


दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ | Mob- 9822720784 | Email- jansanchlan@gmail.com | Title Code- MAHMAR-51647

वर्ष २ रे | अंक : ६६४. वा | शनिवार | दि. २७ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# मराठा समाजाच्या आंदोलनाला मोठं यश...

## मनोज जरांगेंच्या सर्व मागण्या मान्य,मध्यरात्रीच निघाले नवे अध्यादेश...



वृत्तसंस्था/नवी मुंबई

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांना मोठ यश मिळाले आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील आंदोलक मनोज जरांगे यांच्या सर्व मागण्या महायुती सरकारने मान्य केल्या असून याबाबत मध्यरात्रीच अध्यादेश काढण्यात आले आहेत. मंत्री मंगलप्रभात लोढा आणि मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते मराठा आरक्षणासंदर्भातील राजपत्र मनोज जरांगे यांना सुपूर्द करण्यात आले. यानंतर मनोज जरांगे यांनी मध्यरात्री पत्रकारांशी संवाद साधला. आमच्या महत्त्वाच्या मागण्या मान्य झाल्या असून राज्याचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते अध्यादेश स्वीकारुन मनोज जरांगे उपोषण सोडणार आहेत. सरकारच्या शिष्टमंडळाने दिलेल्या अध्यादेशाबाबत मनोज जरांगे यांनी वकिलांशी आणि समाजबांधवांशी तब्बल तीन तास चर्चा केली यांनतर जरांगे यांनी आंदोलन स्थगित करत असल्याची घोषणा केली आहे. दरम्यान, मनोज जरांगे थोड्याचवेळात छत्रपती शिवाजी महाराज चौकात सभा घेणार असून या सभेवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील हजर असणार आहेतमराठ्यांचे भगवं वादळ लवकरच मुंबईत धडकणार होतं. मात्र, त्याआधीच मराठा आंदोलकांचे वादळ शांत करण्यात शिंदे-फडणवीस सरकारला यश आले आहे. राज्य सरकारने मनोज जरांगे यांना सर्व कागदपत्रे दिली आहेत अशी माहिती मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. दरम्यान, केसरकर यांनी मनोज जरांगे यांना उपोषण सोडण्याचीही विनंती केली. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी यावं अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. त्यानुसार आज सकाळी ८ वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मनोज जरांगे उपोषण सोडणार आहेत.

---

## पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन...





















जनसंचलन/बुलडाणा

प्रजासत्ताक दिनाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते शुक्रवार, दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता पोलीस कवायत मैदान येथे ध्वजवंदन करण्यात आले आहे. यावेळी नागरिक, शाळा कॉलेजचे विद्यार्थी तसेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. वळसे पाटील हे २६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता शासकीय विश्राम भवन येथून निघून ९.१५ वाजता भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस कवायत मैदानावर आले व त्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन करून राष्ट्रगीत गाण्यात आले. त्यानंतर पालकमंत्री वळसे पाटील यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. यावेळी आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने,अप्पर पोलीस अधीक्षक महामुनी यांच्यासह आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवा पिढीने व्यसनमुक्तीचा संकल्प घ्यावा तसेच स्वच्छता, वैयक्तिक शौचालये, वसुंधरा व जल संवर्धनाची कामे हाती घ्यावीत ग्रामीण व शहरी भागात घनता असलेल्या गावात सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न मोठा आहे लोकासहभागाद्वारे या समस्येवर मात करणे शक्य आहे स्वच्छ भारत मिशन नगरोत्थान, दलित वस्ती सुधार, तांडा वस्ती, सार्वजनिक आरोग्य मानव विकास जन सुविधा साठी निधी उपलब्ध करून दिला आहे जिल्ह्यासाठी पाणीटंचाई निवारण दुष्काळ व्यवस्थापन मनरेगा सामूहिक कामाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री पाटील यांनी केले आहे. ध्वजवंदन नंतर पालकमंत्री श्री पाटील यांनी परेडचे निरीक्षण केले त्यांच्या हस्ते पोलीस, क्रीडा, भूजल सर्वेक्षण, नगरपालिका, जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच योजनांचा लाभ प्रधान करण्यात आला महसूल पोलीस विभागाला देण्यात आलेली वाहने सुपुत करण्यात आली यावेळी आत्मनिर्भर भारत विकसित भारताची शपथ घेण्यात आली विविध विभागांनी माहिती देणारे चित्ररथ सादर केले शालेय विद्यार्थ्यांनी कवायती सादर केल्या आहे.

# गुन्हेगारी प्रवृत्तीच्या ऋतिक इंगळेची १ वर्षासाठी कारागृहात रवानगी...

जनसंचलन/ खामगाव

विविध गुन्हे करून शहरात दहशत निर्माण करणारा अट्टल गुन्हेगार ऋतिक इंगळे याची एक वर्षासाठी बुलढाणा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे ही कारवाई महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड विघातकृत्यांना आळा घालण्याबाबतचा अधिनियम १९८१ चे कलम ३ (१) नुसार करण्यात आली आहे. स्थानिक कोठारी फैल स्थित ऋतिक रमेश इंगळे २८ याच्या विरुद्ध जबरी चोरी, दंगा, दुखापत, विनयभंग करणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, अवैध दारू विक्री या व अशा प्रकारचे ८ गंभीर गुणे दाखल आहेत. तो शहरात नेहमी दहशत निर्माण करून शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू पाहत पाहतो. याबाबत त्याच्याविरुद्ध अनेक वेळा प्रतिबंध कारवाया सुद्धा करण्यात आल्या आहेत. परंतु या कारवायाला तो जुमानत नसल्यामुळे त्याच्या विरुद्ध आता महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड हातभट्टी वाले औषध द्रव्य विषय गुन्हेगार धोकादायक व्यक्ती कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातकृत्यांना आळा घालण्याबाबतच्या कायद्यानुसार ही कारवाई २४ जानेवारी रोजी करण्यात आली आहे. ऋतिक इंगळे यास एक वर्षासाठी बुलढाणा येथील कारागृहात



स्थानबद्ध करण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक सुनील कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, डीवायएसपी विनोद ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन ठाणेदार शांतीकुमार पाटील, सुरेश नाईकनवरे तसेच पोलीस उपनिरीक्षक पंकज सपकाळ, सहाय्यक फौजदार सतीश चोपडे, पोहेकॉ अरुण हेरोडे, पोकाराम धामोडे यांनी केली आहे.

# स्व. ईन्दुबाई गायकवाड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाला आसन भेट...

जनसंचलन/ खामगाव

शहरातील सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास उर्फ मुन्नाभाऊ शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली मागील २४ वर्षा पासून मंडळाच्या माध्यमातून अनेक धार्मिक व सामाजिक जनसेवा रूग्ण सेवा असे अनेक उपक्रम अखंडपणे निस्वार्थ पारदर्शक भावनेतून ड्ड्ड मुख मे हो राम नाम , राम सेवा हाथ मे ड्ड्डहे ध्येय घेऊन कार्य करत आहे मुन्नाभाऊ यांचे कार्य पाहून त्यांच्या या कार्याला खारीचा वाटा म्हणून भजनी मंडळाच्या संस्थापक सदस्या स्व. ईन्दुबाई साहेबराव गायकवाड यांच्या स्मरणार्थ विनोद गायकवाड प्रमोद गायकवाड व गायकवाड परिवाराच्या वतीने आज दिं २६-१-२०२४ शुक्रवार रोजी भजनी



मंडळा सामुहिक पारायण, व जप करण्यासाठी बसणाऱ्या भक्तांसाठी आसन पट्या भेट देण्यात आल्या या प्रसंगी भजनी मंडळाचे सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा, विनोद भाऊ गायकवाड, अरूण कडवकर, दिलिप झापर्डे, विनोद सुकाळे,प्रमोद गायकवाड,निर्मला गायकवाड, सखुबाई ढवळे, मंगला बावस्कर, संगिता देशमुख, स्वाती गायकवाड व भजनी मंडळाचे सदस्य हजर होते अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

# राहत्या घरासमोर उभी असलेली क्रुझर गाडी अज्ञात चोरट्याने केली लंपास...

जनसंचलन/जलंब

राहत्या घरासमोर उभी असलेली क्रुझर गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २३ जानेवारी च्या मध्यरात्री माटरगाव येथे घडली. याप्रकरणी जलंब पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार याबाबत वृत्त असे की जलंब पो.स्टे अंतर्गत जवळच असलेल्या माटरगाव ता शेगाव येथील रहिवाशी विनोद वाकोडे यांच्या घरासमोर उभी असलेली क्रुझर गाडी क्र.एम एच १९ सी यु ३६७२ हि गाडी कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. अशी तक्रार फिर्यादी संतोष उदयभान गवई रा. टेंभुर्णी यांनी जलंब पोस्टेला दिली. यावरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भा.दं. वि अन्वये गुन्हा दाखल केला असून सदर घटनेचा पुढील तपास कर्तव्यदक्ष ठाणेदार अमोल बारापात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका सचिन बावने करित आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंत्रीखेडेकर येथे सांस्कृतिक कार्यक्रम...

जनसंचलन/ चिखली

चिखली तालुक्यातील मौजे अंत्रीखेडेकर येथे दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी जिल्हा परिषद शाळा अंत्री खेडेकर येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन केले आहे त्यामध्ये अर्धना भक्ती गीत देशभक्तीपर गीते यांचे नृत्य कॉमेडी डान्स भरदार मराठी गीते तर विशेष आकर्षण म्हणून हरोरा डान्स अंत्री खेडेकरचा स्पेशल आर्केस्ट्रा नाटक तसेच आधुनिक काळामध्ये शिक्षण शेती हुंडाबळी स्वच्छता अभियान यावर विशेष भर देणारे नाटिका जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेचे शिक्षक वृंद श्री ज्ञानेश्वर खेडेकर रवि परिहार सर चेके गुरुजी लाहाने सर राऊत सर सुभाष खेडेकर यांनी अधिक परिश्रम घेऊन नियोजनबद्ध कार्यक्रमाचे आयोजन अंत्री खेडेकर येथील जिल्हा परिषद शाळा अंत्रीखेडेकर येथे आयोजन केले आहे तरी सर्व परिसरातील लोकांनी या संस्कृती कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे



आवाहन शिक्षक वृंद व शाळा समिती अध्यक्ष व सदस्य यांनी केले आहे

# शारदा ज्ञानपीठ येथे राष्ट्रीय मतदार दिवस विविध उपक्रमांनी साजरा...

जनसंचलन/बुलडाणा

जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय आणि मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाच्या वतीने शारदा ज्ञानपीठ येथे राष्ट्रीय मतदार दिवसानिनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाला शारदा ज्ञानपीठचे अध्यक्ष डॉ. देशपांडे बुलढाणा, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहसिनी गोणेवार, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, शरद पाटील, उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव, तहसिलदार रूपेश खंडारे, गटविकास अधिकारी सरीता पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात शारदा ज्ञानपीठ, श्री शिवाजी विद्यालय, एडेड हायस्कूल, पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित पोस्टर, रांगोळी, चित्रकला स्पर्धेच्या प्रदर्शनीची पाहणी केली. तसेच विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी यांनी मतदानाचे महत्व समजावून सांगून उपस्थित विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी करून भविष्यात जागरूक मतदार होण्याचे आवाहन केले. जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील लोकसंख्या, मतदार, मतदारांची टक्केवारी, मतदारयादीतील इतर तपशिलाची माहिती दिली. जिल्हाधिकारी यांनी विशेषत: नवीन मतदारांना नोंदणीसाठी प्रोत्साहित करून नोंदणी सुलभ करणे आणि जास्तीत जास्त नोंदणी, मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेची माहिती देऊन सहभाग वाढविण्याचे आवाहन केले.यावेळी नवमतदारांचा सत्कार करण्यात आला. त्यांना राष्ट्रीय मतदार दिवस समारंभात मतदार फोटो ओळखपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमात राष्ट्रीय मतदारदिनानिमित्त लोकशाही निष्ठा ठेवण्यासंबधी शपथ देण्यात आली.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# शेतकऱ्यांना भरीव मदत करण्यासाठी प्रयत्नशील-पालकमंत्री दिलीप वळसे पाटील

जनसंचलन/बुलडाणा

राज्य शासन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कटीबद्ध आहे. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अग्रक्रमाने देण्यात येत आहे. त्यासोबतच एक रूपयात पिक विमा, सौर कृषि पंप आणि नुकसान भरपाई देताना मदतीसाठी क्षेत्र वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना भरीव मदत करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले. प्रजासत्ताक दिनाच्या ७४व्या वर्धापन दिनानिमित्त पालकमंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी, दि. २६ जानेवारी रोजी पोलीस कवायत मैदान येथे ध्वजवंदन झाले. यावेळी आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने आदी उपस्थित होते. श्री. पाटील म्हणाले, शेतीपिकांच्या नुकसान भरपाईसाठी शासनाकडून आतापर्यंत सुमारे १५१ कोटी रूपये मंजूर झाले आहे. ही नुकसान भरपाई देताना तीन हेक्टरपर्यंत मर्यादा वाढविली आहे. तसेच खरीप हंगामात १२६० कोटी रूपये आणि रब्बी हंगामात ३३५ कोटी रूपये असे एकूण १ हजार ६०० कोटी रूपयांपर्यंत पिक कर्ज दिले आहे. खरीप हंगामात साडेसात लाख हेक्टर, तर रब्बी हंगामात तीन लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना व नमो किसान महासन्मान निधी योजनेंतर्गत प्रती वर्ष १२ हजार रूपये अर्थसहाय्य देण्यात येत आहे. जिल्ह्याची सोयाबीनची उत्पादकता ही १५०० किलो प्रती हेक्टर इतकी असून ती देशाच्या सरासरी उत्पादकतेपेक्षा अधिक आहे, ही अभिमानाची बाब आहे. मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेसाठी २ हजार हेक्टर जमीन प्रदान केली आहे.जिगाव प्रकल्पाद्वारे २६ टीएमसी पाणीसाठा करून सहा तालुक्यात एक लाख दोन हजार हेक्टर सिंचनक्षेत्र निर्मितीचे उद्दीष्ट निश्‍चित केले आहे. प्रकल्पासाठी ७ हजार ४०० कोटी रूपये उपलब्ध झाले आहे. विविध आवास योजनेतून १७ हजार ५५ घरकुलांकरीता २६७ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नुकत्याच झालेल्या श्रीराम प्राणप्रतिष्ठा आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त जिल्ह्यात ४ लाख ८१ हजार २७५ आनंदाचा शिधा वाटप केले आहे. चालू वर्षात ४५३ कोटी रूपयांची निर्यात झाली आहे. प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत ५०० हून अधिक प्रस्तावांना आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. मुद्रा योजनेतून ४८१ कोटी रूपये इतका कर्जपुरवठा करण्यात आला आहे. पीएम विश्‍वकर्मा योजनेद्वारे युवकांना सहाय्य व शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येत आहे. पर्यटन विकासासाठी नियोजन समितीमार्फत वीस कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. शासनाने ३६९ कोटी रूपयांचा लोणार आणि २६० कोटी रूपयांचा सिंदखेडराजा विकास आराखडा तयार केला आहे. जिल्हा नियोजन समितीतून दर्जेदार व अत्याधुनिक शैक्षणिक सोयीसुविधांकरीता सुमारे २४ कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. तसेच आरोग्य सुविधांसाठी सुमारे १५ कोटींहून अधिक निधी दिला आहे. नगरोत्थान योजना, दलित वस्ती व दलितेतर विकास योजना, तांडा वस्ती विकास या योजनांकरीता सुमारे ३१ कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. प्रभावी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस विभागाला १६ कोटींचा निधी देण्यात आला आहेत. युवा पिढीने व्यसनमुक्तीचा संकल्प घ्यावा, तसेच स्वच्छता, वैयक्तिक शौचालये, वसुंधरा व जल संवर्धनाची कामे हाती घ्यावीत, ग्रामीण व




शहरी भागात घनता असलेल्या गावात सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्‍न मोठा आहे. लोकसहभागाद्वारे या समस्येवर मात करणे शक्य आहे. स्वच्छ भारत मिशन, नगरोत्थान, दलित वस्ती सुधार, तांडा वस्ती, सार्वजनिक आरोग्य, मानव विकास, जनसुविधांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. जिल्ह्यासाठी पाणीटंचाई निवारण, दुष्काळ व्यवस्थापन, मनरेगा, सामुहिक कामाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री. पाटील यांनी केले. ध्वजवंदन नंतर पालकमंत्री श्री. पाटील यांनी परेडचे निरीक्षण केले. त्यांच्या हस्ते पोलिस, क्रीडा, भुजल सर्व्हेक्षण, नगर पालिका, जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच योजनांचा लाभ प्रदान करण्यात आला. महसूल, पोलिस विभागाला देण्यात आलेली वाहने सुपुर्द करण्यात आली. यावेळी आत्मनिर्भर भारत, विकसित भारतची शपथ घेण्यात आली. विविध विभागांनी माहिती देणारे चित्ररथ सादर केले. शालेय विद्यार्थ्यांनी कवायती सादर केल्या. साहेबराव सोळंकी, अपेक्षा इंगळे यांनी सूत्रसंचालन केले.

## छावा संघटना जिल्हाध्यक्ष अशोकराव राजे जाधव यांच्या पुढाकारातून आज सेलू येथे रस्ता दुरुस्ती कामाचे उद्घाटन...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

दि २६ जानेवारी प्राजाकसत्ता दिनाचे औचित्य साधून सेलू ते भोसा या रस्त्याचे दुरुस्ती चे काम आज महेश भैय्या डोंगरे पाटील यांच्या संकलपनेतून अखील भारतीय छावा संघटना जिल्हाध्यक्ष अशोकराव राजे जाधव यांच्या पुढाकारातून आज रस्ता दुरुस्ती कामाचे उद्घाटन करण्यात आले सेलू येथील रस्तावर खूप झाडे व गट्टे पडले होते रस्तयाची खूप दुरवस्था झाली होती गेल्या १५ वर्षांपासून या रस्त्याची दुरवस्था झाली होती प्रशासनाला वार वार सांगूनही प्रशासनाच्या निदर्शनास आले नाही सेलू हे गाव विदर्भ आणि मराठवाडा च्या सीमेवर असलेल्या गाव आहे गावातील नागरिकांना असे वाटत होते की भारत स्वंतत्र झाला पण गाव स्वंतत्र झाला नाहि सेलू गावातील नागरिकांनी ह्या गावाचा विकास होत नसल्यामुळे गाव विक्रीला काढण्याची परवानगी मुख्यमंत्री यांच्याकडं घेणार होते सदर ही बाब महेश भैय्या डोंगरे पाटील यांना कळताच त्यांनी तात्काळ अखील भारतीय छावा संघटना बुलडाणा जिल्हाध्यक्ष अशोकराव राजे जाधव यांना सांगितली आणि सेलू गावाचा विकास बाबत काय माघे आहे त्याची माहिती घेतली त्यातून त्यांना कळाले की गावाचा विकास बाकी आहे आणि गावाचा विकास हा गावात जाणाऱ्या



रस्त्यापासून होत असतो गावाचा विकास कसा झाला पण गावाचे जाणाऱ्या रस्त्यापासून खूप वर्षांपासून दुर्व्यवस्ता झालेली आहे हीच बाब लक्षात घेऊन भारतीय प्राजाक सत्ता दिनाचे औचित्य साधून आज महेश भैय्या डोंगरे पाटील यांच्या संक्पनेतून अखील भारतीय छावा संघटना बुलडाणा जिल्हा अध्यक्ष अशोक राजे जाधव यांनी सेलू येथे जाऊन रस्ता दुरुस्ती कामाचे उद्घाटन केले गावकऱ्यांना आज खऱ्या अर्थाने गावाचा विकास होत आहे असे वाटत आहे अशोक राजे जाधव म्हणाले की गावकऱ्यांनी साथ दिली तर सेलू गाव सिंदखेड राजा तालुक्यातील सर्वात मोठे विकासाबाबत विकास करू गावातील नागरिकांना कोणत्याही अडचणी असो ट्या अडचणीचा नक्की आपण कायदापलत करू आणि गावाचा विकास करू त्यावेळी छावा नेते संजय उगले, जिल्हा उपाध्यक्ष गोविंद टेके, विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब शेळके पाटील , गावाचे सरपंच गणेश किंगर, उपसरपंच आबासाहेब एखंडे, पोलीस पाटील आणासहेब पाटील एखडे , ग्रामसेवक गोपाळ पवार, तंटा मुक्ती अध्यक्ष धुळाजी एखंडे, ग्रामपंचायत सदस्य आत्माराम एखंडे, निऊर्ती एखंडे, लाहुरव एखंडे, सर्जेराव एखंडे , उद्धव एखंडे, बापूराव एखंडे, दिपक एखंडे, धोंदिभाऊ एखंडे, छावा नेते अमोल एखंडे, या सह अनेक गावकरी मंडळी उपस्थित होते

## महाराष्ट्र मध्ये दलित महासंघ ज्या बाजूला जाईल त्याच बाजूच सरकारचा विजय होईल - सर्जेराव जाधव

जनसंचलन/ सिंदखेडराजा

महाराष्ट्र मध्ये दलित चळवळीमध्ये आपण गेलीतीस वर्षे पासून दलित चलवलित काम करत आहोत संबंध महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात खेड्यापाड्यात गावात जिल्ह्यात दलित महासंघाच्या शाखेच्या जाळ पसरल आहे दलिताच्या अडीअडचणीमध्ये सुख दुखामध्ये मातंग बौद्ध चर्मकार समाजाच्या महिलेवर मुलीवर झालेल्या अन्याय अत्याचार बलात्कार खून याप्रकरणी आपण सातत्याने न्याय मिळवून देण्याचे काम केले त्यामुळे दलित समाज मोठ्या प्रमाणात आपल्या सोबत आहे त्याच दलित महासंघाच्या कार्यकर्त्यांनी काम करत असताना जिल्हा परिषद निवडणूक असेल पंचायत समितीचा निवडणूक असेल नगरपालिकेचा मेंबर असेल नगरसेवक नगराध्यक्ष ची निवडणूक असेल या विधानसभा निवडणुका असेल त्यामध्ये सातत्याने भूमिका बजावून तळागाळातील दलित बहुजन पर्यंत जाऊन त्याची मनधरणी करून तळागाळातल्या शेवटच्या घटकापर्यंत जाऊन मातंग बौद्ध समाज हा विकणारा समाज आहे असा भ्रम राजकीय पुढाऱ्याचा झाला असून मातंग बौद्ध समाज हा विकणारा समाज नसून हा पाडणारा समाज आहे किंवा निवडून आणणारा समाज आहे आज राजकारणामध्ये मातंग समाजाला म्हणतात इमानदार समाज आहे त्याच्या पाठीवर हात फिरवून कमरेत लाथ मारल्यासारखी पद्धत करतात बौद्ध समाजाला म्हणतात आघाव समाज आहे म्हणून त्याला सत्तेपासून दूर ठेवल्या जागेला आहे त्याच अनुषंगाने



आता आम्ही गप्प बसणार नाही तुम्हाला ज्याच्या जशास तसे उत्तर देऊ जर मातंग बौद्धांना सत्तेपासून दूर ठेवत असाल तर आम्हीही त्या गोष्टीचा विचार करू असेही मातंग समाजाच्या मेळाव्यामध्ये रिसोड तालुक्यामध्ये सर्जेराव दादा जाधव बोलत होते हजारोच्या संख्येने कार्यकर्त्याचा जनसमुदाय कार्यक्रमाला जमलेला होता आज मोठ्या प्रमाणात असलेली मातंग बौद्ध समाजाची ताकद या ताकतीचा गैरवापर राजकीय पुढारी करीत असून राजकीय पुढारी लक्षातून काढून टाकावं मातंग बौद्ध समाज हा विकणारा समाज असून या समाजात समाजाने भूमिका स्पष्ट केली तर ज्या बाजूला समाज जाईल त्या बाजूचा आमदार या खासदार निवडून येईल असे सर्जेराव जाधव आपला भाषणामध्ये साखरखेडा या गावांमध्ये सिंदखेडराजा मतदारसंघात बोलत होते ते पुढे म्हणाले की गेली १८ वर्षापासून आपण सिंदखेड मतदर संघामध्ये कार्य करत आहोत संबंध तालुक्यात व जिल्ह्यात बुलढाणा जिल्ह्यामध्ये दलित महासंघाचा गावागावात शाखा कार्यकर्ते असून या मतदारसंघाचा आमदार आपण निवडून आणू शकतो त्या पाडू शकतो असेही सर्जेराव जाधव आपल्या भाषणामध्ये बोलत होते

# सहकार विद्या मंदिरमध्ये गणतंत्र दिन अत्यंत उत्साहात साजरा...

## प्रजासत्ताक दिनानिमित्त बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक यांच्या हस्ते ध्वजवंदन...















**जनसंचलन/बुलढाणा**

सहकार विद्या मंदिरमध्ये गणतंत्र दिन अत्यंत उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष श्री. राधेश्यामजी चांडक, मुख्य कार्यकारी संचालक डॉ.सुकेशजी झंवर, संस्थेच्या अध्यक्षा सौ.कोमल झंवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात ध्वजवंदनाने झाली. त्यानंतर मुख्य अतिथी श्री. भाईजी यांनी शालेय प्रगतीचा आलेख उंचावल्याचे सांगत सहकार विद्या मंदिरच्या सर्व ब्रॉंच स्कुल मिळून आज ३०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहे. तसेच जगामध्ये जे जे चांगले आहे ते विद्यालयामध्ये आणण्याचा नेहमी प्रयत्न करणार असल्याचे संगितले. यानंतर एन.सी.सी. व एस.डी.ए. च्या विद्याथ्र्यांमार्फत मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांना मानवंदना देण्यात आली. विद्यालयाच्या विद्याथ्र्यांनी कॅन्सर पेशंट करीता जमा केलेला निधी रु.२,१५,०००/- केअरींग सोल्स फाऊडेशन, लखनऊ ला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यानंतर पोल मल्लखांब, जिम्नॅस्टीक, योगा, सविमं ब्रॉड, डान्स, डंबेल्स, सिंअर ड्रिल, बॉक्सींग, रिंग ड्रिल, स्केटींग, ॲरोबींक्स, स्किपिंग, ॲडव्हेचर ॲक्टीव्हीटी यासारखे विविध रंगारंग कार्यक्रमाचे स्थितबध्द नियोजन करण्यात आले होते. यावेळेस विद्याथ्र्यांनी चित्तधरारक कसरती करीत उपस्थितांना आश्चर्यचकित केले. तसेच प्रभु रामचंद्र दरबाराची बुलेट शोभा यात्रा काढण्यात आली. यानंतर मान्यवरांनी रामदरबाराचे पुजन केले. यावेळेस संपूर्ण उपस्थित गण व परिसर राममय झालेला होता. या कार्यक्रमाच्या नंतर वार्षिक क्रिडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात डॉ.झंवर सर यांनी विद्यालयाने आयोजीत केलेल्या विविध क्रिडा उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी त्यांनी वार्षिक क्रिडा सप्ताहाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. कार्यक्रमाचे सुत्रंसचालन सौ.पुजा मॅडम व श्री. गणेश सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य, मुख्याध्यापक, प्रशासकीय अधिकारी, सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी वर्गाने अथक परीश्रम घेतले.

## स्वाभिमानीचे राजू शेट्टी भाजप कार्यालयात राजकीय चर्चेला उधाण...

**वृत्तसंस्था/मुंबई**

शेट्टी यांनी भाजपपासून फारकत घेतली आहे. तसेच त्यांचे इंडिया आघाडीशी जमेनासे झाले आहे. आगामी निवडणूक एकला चलो रेच्या भूमिकेत लढवणार असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यातच शेट्टी भाजप कार्यालयात गेल्याने राजकीय वर्तुळात भुवया उंचावल्या आहेत. शहरात ग्रामदैवत शाकंभरी महोत्सव सुरू आहे. यानिमिताने राजू शेट्टी यांनीही चौंडेश्वरी देवीचे दर्शन घेतले यावेळी भाजप युवा मोर्चा वाळवा तालुकाध्यक्ष प्रवीण माने यांनी शेट्टी यांना कार्यालयास भेट देण्याची विनंती केली. शेट्टी यांनी या विनंतीला कसलेही आढेवेढे न घेता संमती दिली आणि काही वेळातच शेट्टी यांनी आष्टा येथील भाजप कार्यालयात पाऊल ठेवले. यावेळी माने यांच्या हस्ते शेट्टी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विविध विषयावर गप्पा रंगल्या. शहरात सुरू असलेल्या विकासकामाबाबत समाधानही व्यक्त केले. यावेळी स्वाभिमानीचे अरुण कवठेकर, नितीन चौगुले, अभय बसुगडे, भाजपचे उदय कवठेकर, संजय सावंत, रविराज चव्हाण, दत्ता कोळेकर, नरेश घाडगे, शिवप्रसाद भोसले, स्वप्नील मुळीक, कन्हैया मंडले, अविनाश औताडे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी तालुकाध्यक्ष माने यांनी भाजप तसेच निशिकांत पाटील यांच्यावतीने शहरात सुरु असलेल्या विकासकामांबाबत तसेच सर्वसामान्य जनतेसाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिती. गेल्या काही दिवसांपासून हातकणंगले लोकसभा मतदारसंघात भाजप आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारीवरून जोरदार हालचाली सुरू आहेत. शेट्टी यांनी महाविकास आघाडीचे नेते व शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. त्यानंतर काँग्रेसचे माजी मंत्री सतेज पाटील यांनी शेट्टींचा लवकरच इंडिया आघाडीत प्रवेश असल्याचे संकेत दिले होते. त्यानंतर महायुतीच्या एका बड्या नेत्याने शेट्टी महायुतीबरोबर येण्यास इच्छुक असतील तर त्यांना सोबत घेऊ असे सांगितले होते. त्यानंतर शेट्टी यांच्या भाजपा कार्यालय भेटीची चर्चा रंगली. त्यामुळे अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे. तर भाजपपासून फारकत घेवूनही त्यांच्याच कार्यालयाला भेट दिल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. साखर कारखानदारांमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी हितासाठी लढा देत आहे. आष्टा परिसरात माने आणि त्यांचे सहकारी कौतुकास्पद काम करीत आहेत. सामान्यांना आधार देत आहेत. ऊस दर लढ्यात सक्रिय सहभाग घेताना शेतकरी बांधवांना दिलासा दिला होता. त्यांनी शेतकरी हितासाठी सहकार्य करावे, अशी अपेक्षा शेट्टी यांनी व्यक्त केली.

## जरांगे-पाटलांची नवी मागणी सरकार मान्य करणार?

**वृत्तसंस्था/मुंबई**

मराठा आरक्षणाचे झुंजार नेते मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारसमोर नवी अट ठेवली आहे. या नव्या अटीमुळे राज्य सरकार कात्रीत सापडले आहे. आधीच सगेसोयरे या शब्दाच्या कैचीत जरांगे-पाटील यांनी राज्य सरकारला पकडले असताना आता या नव्या मागणीमुळे सरकारची पुरती कोंडी होऊ शकते. मराठा समाजाला सुप्रीम कोर्टाकडून आरक्षण मिळेपर्यंत राज्य सरकारने मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यावे, अशी मोठी आणि धाडसी मागणी जरांगे-पाटील यांनी केली आहे. एवढेच नाही तर मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे शिक्षण मोफत द्यावे, अशी ही मागणी आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या या नव्या मागणीमुळे सरकारसमोरील अडचणीत भर पडली आहे. त्यातच मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत राज्य सरकारने सरकारी नोकरभरती करू नये, अशी मोठी मागणी जरांगे-पाटील यांनी केली. ही अट म्हणजे सरकारला खिंडीत पकडण्याचा प्रकार सांगितला जातो. त्याचवेळी जरांगे-पाटील पाटील एक बाब स्पष्ट केली आहे की, जर सरकारने नोकर भरती केली तर मराठ्यांचे आरक्षण राखीव ठेवावे. जरांगे-पाटील यांनी सरकारसमोर या अटी ठेवल्याने



महायुती सरकार कोंडीत सापडल्याचे स्पष्ट झाले आहे. मराठा आंदोलकांना मुंबईत येऊ न देण्यासाठी त्यांना नवी मुंबईतच रोखण्याची सरकारची खेळी आहे. पण जरांगे-पाटील सरकारला पुरून उरल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकारने आज रात्रीपर्यंतच नवा जीआर काढावा, अशी आग्रही मागणी जरांगे-पाटील यांनी केली आहे. त्याउपर आम्हाला त्रास देण्याचा सरकारने प्रयत्न केला तर उद्या आझाद मैदानात जाणारच, असा इशाराही त्यांनी दिला आहे. जरांगे-पाटील यांच्या या नव्या आक्रमक खेळीमुळे मराठा आरक्षणाबाबत सरकार केवळ चालढकल करत असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळेच आज चर्चेसाठी सरकारचे शिष्टमंडळ आले होते, मंत्रीमहोदय नव्हते, हे सुरुवातीलाच जरांगे-पाटील यांनी स्पष्ट केले होते. जरांगे-पाटील यांनी दुपारी साडेबारा वाजता नवी मुंबईतल्या वाशीतील शिवाजी चौकात भाषणाला सुरुवात केली. पण साऊंड सिस्टीम बिघडल्याने त्यांनी दोन वाजता सभा घेणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर दोन वाजता सभा सुरू झाली आणि जरांगे-पाटील यांनी ३ वाजून १६ मिनिटांनी बोलायला सुरुवात केली. आपल्या ४५ मिनिटांच्या भाषणात त्यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले आणि एकदा आझाद मैदानाकडे निघालो की १०० टक्के आरक्षण घेतल्याशिवाय परत जाणार नाही, असा इशारा जरांगे-पाटील यांनी दिला

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958